ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०६ वा ❑ भारतीय सौर दिनांक १४ आश्विन शके १९४८, मंगळवार दि.०६ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

भाषिक संवर्धनासाठी पुण्यात मराठीचे 'उत्कृष्टता केंद्र'

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

मराठी भाषेला नुकताच प्राप्त झालेला अभिजात दर्जा हा केवळ एका भाषेचा सन्मान नसून, तो महाराष्ट्राच्या वैभवशाली संस्कृतीचा, प्रदीर्घ परंपरेचा आणि हजारो वर्षांच्या साहित्याचा जागतिक पातळीवर झालेला अत्यंत मोठा गौरव आहे. याच ऐतिहासिक यशाच्या पार्श्वभूमीवर, भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि तिच्या सखोल संशोधनासाठी एका भक्कम संस्थात्मक पाठिंब्याची नितांत आवश्यकता होती. हीच दूरगामी गरज ओळखून, अभिजात मराठी भाषा दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने पुण्यामध्ये अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यास अधिकृत आणि महत्त्वपूर्ण मंजुरी दिली आहे. हा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्र, देश आणि जगभरात विखुरलेल्या तमाम मराठी जनांसाठी अत्यंत अभिमानाचा, अस्मितेचा आणि आनंदाचा सर्वोच्च क्षण ठरला आहे. या निर्णयामुळे मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेला, तिच्या प्राचीन अस्तित्वाला आणि उज्ज्वल भविष्याला आता राष्ट्रीय पातळीवर हक्काचे, अधिकृत आणि जागतिक दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

हे राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण उत्कृष्टता केंद्र विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातील अत्यंत नावाजलेल्या आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था येथे साकारण्यात येणार आहे. डेक्कन कॉलेज ही केवळ एक शैक्षणिक संस्था नसून, ती भाषाशास्त्र, प्राचीन इतिहास, पुरातत्त्व आणि भारतीय संस्कृतीच्या प्रदीर्घ अध्ययन आणि संशोधनासाठी संपूर्ण देशभरातील अत्यंत प्रतिष्ठित आणि अग्रणी संस्था मानली जाते. या संस्थेला लाभलेली संशोधनाची जवळपास २०० वर्षांची प्रदीर्घ परंपरा, तेथील अभ्यासपूर्ण वातावरण आणि अफाट ग्रंथसंपदा पाहता, या केंद्राच्या स्थापनेसाठी यापेक्षा अधिक योग्य जागा असू शकत नाही. याच ज्ञानमंदिराच्या प्रांगणात आता अभिजात मराठीच्या प्राचीन साहित्याचा, भाषेच्या २००० वर्षांच्या ऐतिहासिक वाटचालीचा आणि विविध साहित्यिक तसेच भाषावैज्ञानिक पैलूंचा अत्यंत सूक्ष्म, सखोल आणि जागतिक मानकांनुसार वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जाईल.

या उत्कृष्टता केंद्राच्या माध्यमातून मराठी भाषेच्या उत्पत्तीपासून ते आजच्या आधुनिक स्वरूपापर्यंतच्या प्रवासाचा अत्यंत बारकाईने वेध घेणे शक्य होणार आहे. प्राचीन शिलालेख, विविध कालखंडातील ताम्रपट, जुनी दुर्मिळ हस्तलिखिते, महानुभाव व वारकरी संप्रदायाचे साहित्य आणि प्राचीन ग्रंथांचे जतन, संवर्धन तसेच त्यांचे अंकीय स्वरूपात (संगणकीय) जतन करण्याचे मोठे व अत्यंत जिकिरीचे काम या केंद्रातर्गत अपेक्षित आहे. याशिवाय, प्राकृत आणि महाराष्ट्री अपभ्रंश भाषांमधून मराठीचा कसा विकास होत गेला, तसेच यादव काळापासून ते शिवकाळापर्यंत भाषेने कोणती वळणे घेतली, यावर सखोल भाषिक आणि व्याकरणात्मक संशोधन करण्यासाठी हे केंद्र एक जागतिक दर्जाची प्रयोगशाळा म्हणून उदयास येईल. देश-विदेशातील अभ्यासकांना, भाषा वैज्ञानिकांना आणि नव्या पिढीतील संशोधकांना मराठी भाषेवर उच्चस्तरीय संशोधन करण्यासाठी हे केंद्र सर्व अत्याधुनिक सुविधा, दुर्मिळ ग्रंथांचे संदर्भ आणि भक्कम आर्थिक पाठबळ पुरवण्याचे अत्यंत कळीचे काम करणार आहे.

या महत्त्वाकांक्षी उत्कृष्टता केंद्राच्या स्थापनेसाठी राज्य शासनाकडून केंद्र सरकारकडे अत्यंत सातत्याने आणि प्रभावीपणे पाठपुरावा करण्यात येत होता. या निरंतर आणि अथक प्रयत्नांना अखेर मोठे यश आले असून, आता राज्य सरकारने या केंद्रासाठी आवश्यक असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे महत्त्वपूर्ण काम अत्यंत वेगाने हाती घेतले आहे. हा सर्वंकष अहवाल पूर्ण करून तो केंद्र सरकारकडे सादर केल्यानंतर, या केंद्राच्या प्रत्यक्ष उभारणीसाठी, साधनसामग्रीसाठी आणि पुढील प्रगत संशोधनासाठी आवश्यक असणारा कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध होण्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाचे अत्यंत उत्साहाने आणि भावपूर्ण शब्दांत स्वागत केले असून, त्यांनी महाराष्ट्राच्या हिताच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे विशेष आभार मानले आहेत. पुण्यातील हे अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र केवळ एका वास्तूपुरते मर्यादित राहणार नसून, ते मराठी भाषेचे जागतिक संशोधन केंद्र म्हणून नावारूपास येईल. यामुळे मराठी साहित्याचे जगभरातील इतर भाषांमध्ये भाषांतर करणे, जागतिक स्तरावर मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करणे आणि भावी पिढ्यांच्या मनात आपल्या मातृभाषेविषयी सार्थ अभिमान जागृत करणे अधिक सुकर होणार आहे. येणाऱ्या काळात हे केंद्र महाराष्ट्राच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालेल आणि मराठी भाषेच्या संवर्धनाच्या चळवळीला एक नवी, सक्षम आणि अत्यंत प्रगल्भ दिशा देईल, असा ठाम विश्वास या महत्त्वपूर्ण ऐतिहासिक निर्णयामुळे निर्माण झाला आहे.

ज्येष्ठ साहित्यिक डी. बी. जगत्पुरिया यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय प्रज्ञा पुरस्कार जाहीर

बाली (इंडोनेशिया) येथील जागतिक साहित्य संमेलनात होणार सन्मान मुख्य अतिथी म्हणूनही निमंत्रण

ज्योतिर्मय साहित्य

नागपूर – विख्यात कवी, समीक्षक आणि ज्येष्ठ पत्रकार डी. बी. जगत्पुरिया यांना जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ, नागपूर तर्फे दिला जाणारा अत्यंत मानाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय प्रज्ञा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.

इंडोनेशियातील बाली येथे येत्या १९ आणि २० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या जागतिक साहित्य संमेलनात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या संमेलनासाठी त्यांना मुख्य अतिथी म्हणूनही निमंत्रित करण्यात आले आहे. या दुहेरी बहुमानाबद्दल साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून डी. बी. जगत्पुरिया यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांनी हा सन्मान अत्यंत नम्रपणे आपले आप्तस्वकीय, मित्र परिवार आणि



चाहत्यांना अर्पण केला आहे.


डी. बी. जगत्पुरिया यांचे साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. त्यांच्या नावावर मराठी व हिंदी कवितासंग्रह, ५ समीक्षा ग्रंथ, सामाजिक-वैचारिक ग्रंथ, व्यक्तिचित्रे, नाटक आणि एकांकिका अशी सुमारे ३० ते ३२ पुस्तके प्रसिद्ध आहेत. याशिवाय, ३५ वे अस्मितादर्श साहित्य संमेलन, अंकुर साहित्य संमेलन आणि इतर अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे.

कथा, कविता आणि सामाजिक लेखन करणाऱ्या तब्बल ७० हून अधिक लेखकांच्या पुस्तकांना त्यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यांच्या या प्रदीर्घ सेवेबद्दल त्यांना यापूर्वी अनेक राज्यस्तरीय आणि ७ राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. जागतिक आंबेडकरवादी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांनी पत्र पाठवून जगत्पुरिया यांचे वशेष अभिनंदन केले आहे.

जनमानसाची नाडी ओळखणारे संघटक - गोविंदराव याळगी

ज्योतिर्मय साहित्य

गोविंदराव याळगी हे बेळगाव परिसरातील स्वातंत्र्यलढ्याचे एक धाडसी, संघटनक्षम आणि दूरदर्शी कार्यकर्ते होते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे ते निष्ठावान अनुयायी होते. त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव, शिवजयंती, राष्ट्रीय शिक्षण, तरुणांचे संघटन आणि क्रांतिकारक प्रशिक्षण या विविध माध्यमांतून ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती केली. त्यांच्या कार्यामुळे याळगी कुटुंब हे बेळगावच्या स्वातंत्र्यचळवळीचे एक महत्त्वाचे केंद्र बनले. त्यांच्या प्रेरणेने कुटुंबातील अनेक सदस्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला आणि अनेकांना तुरुंगवास, आर्थिक संकटे व शारीरिक छळ सहन करावा लागला.१९०५च्या बंगालच्या फाळणीविरोधी आंदोलनापासून १९४२च्या 'भारत छोडो' आंदोलनापर्यंत याळगी कुटुंबाचा सहभाग सातत्याने राहिला.



एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी बेळगाव हे मुंबई इलाख्यातील महत्त्वाचे शहर होते. व्यापारी, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या ते कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमाभागातील प्रमुख केंद्र होते. या प्रदेशात मराठी आणि कन्नड अशा दोन्ही भाषिक समाजांचे वास्तव्य होते. व्यापारामुळे विविध भागांतील लोकांशी संपर्क असलेल्या बेळगावात राजकीय विचारांची देवाणघेवाण तुलनेने वेगाने होत असे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्याचे कार्य सुरू केले. धार्मिक-सांस्कृतिक उत्सवांना सामाजिक आणि राजकीय जागृतीचे रूप देणे, हा त्या काळातील एक प्रभावी प्रयोग होता. ब्रिटिश राजवटीत थेट राजकीय सभा घेण्यावर निर्बंध असले तरी धार्मिक उत्सव, व्याख्याने, मिरवणुका आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या माध्यमातून स्वराज्याचा संदेश सामान्यांपर्यंत पोहोचवता येत होता.



याच वातावरणात गोविंदराव याळगी पुढे आले. ते केवळ राजकीय कार्यकर्ते नव्हते, तर जनमानसाची नाडी ओळखणारे संघटक होते. त्यांनी बेळगावमध्ये राष्ट्रभक्तीची चळवळ उभी करण्यासाठी धर्म, संस्कृती, व्यायाम, संघटन आणि राजकीय प्रतिकार यांचा परस्परपूरक उपयोग केला.

गोविंदराव याळगी यांच्या विचारांवर लोकमान्य टिळकांचा खोल प्रभाव होता. टिळकांच्या मते स्वराज्याची भावना केवळ विद्वान किंवा राजकीय नेत्यांपुरती मर्यादित न राहता सामान्य लोकांमध्ये रुजली पाहिजे. त्यासाठी सार्वजनिक उत्सव, वृत्तपत्रे, व्याख्याने आणि संघटनात्मक कार्य यांचा उपयोग करणे आवश्यक होते. गोविंदरावांनी हा विचार मनापासून स्वीकारला.टिळकांशी त्यांचा संबंध हा केवळ भावनिक भक्तीचा नव्हता. ते टिळकांच्या राष्ट्रवादी राजकारणाचे सक्रिय कार्यकर्ते होते. बेळगावमध्ये टिळकांच्या सभा, मिरवणुका आणि कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्यांची कार्यपद्धती धाडसी, प्रसंगावधान राखणारी आणि लोकांना एकत्र आणणारी होती.


१९०६ मध्ये गोविंदरावांना दारूच्या दुकानासमोर निदर्शने केल्याबद्दल अटक झाली. ब्रिटिश राजवटीविरुद्ध जनतेमध्ये असंतोष निर्माण करणाऱ्या अशा आंदोलनांकडे सरकार गंभीर गुन्हा म्हणून पाहत असे. लोकमान्य टिळकांनी त्यांचा दंड भरून त्यांची सुटका केली आणि ब्रिटिशविरोधी कार्य सुरू ठेवण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. या घटनेतून गोविंदराव याळगी आणि टिळक यांच्यातील मैत्रभाव दिसून येतो. गोविंदराव याळगींच्या सार्वजनिक कार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे बेळगावातील सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात. १९०५ मध्ये टिळकांच्या प्रेरणेने त्यांनी आपल्या घरासमोरील मोकळ्या जागेत गणेशमूर्तीची स्थापना करून सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. त्या काळात सार्वजनिक उत्सव आयोजित करणे म्हणजे लोकांना एकत्र आणणे, राष्ट्रभक्तीचे विचार पोहोचवणे आणि सामाजिक ऐक्य निर्माण करणे होय.

या गणेशोत्सवात धार्मिक विधींबरोबरच व्याख्याने, भजन, कीर्तन, देशभक्तिपर कार्यक्रम आणि सामाजिक चर्चा होत असत. त्यामुळे उत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता राष्ट्रीय जागृतीचे माध्यम बनला. सामान्य नागरिक, व्यापारी, तरुण आणि विद्यार्थी या कार्यक्रमांकडे आकर्षित झाले.

१९०६ मध्ये लोकमान्य टिळक बेळगावातील गणेशोत्सवाला उपस्थित राहिले. गोविंदरावांच्या नेतृत्वाखाली टिळकांची मोठी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीला एवढी मोठी गर्दी झाली की गणेशमूर्तीची स्थापना पुढे झेंडा चौकात करण्यात आली. तेथील गणेशोत्सवाची परंपरा पुढेही कायम राहिली.या घटनेचे महत्त्व केवळ धार्मिक परंपरेपुरते मर्यादित नाही. सार्वजनिक गणेशोत्सवामुळे बेळगावात सामूहिक राष्ट्रभावनेचे वातावरण तयार झाले. लोकमान्य टिळकांचे दर्शन, त्यांची भाषणे आणि त्यांच्या विचारांचा प्रसार यामुळे स्वराज्य, स्वदेशी आणि ब्रिटिशविरोधी प्रतिकार यांना जनाधार मिळाला.

ब्रिटिश सरकार लोकमान्य टिळकांच्या प्रभावाला घाबरत होते. त्यांच्या भाषणांमुळे जनतेमध्ये राजकीय जागृती होईल आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोष वाढेल, अशी सरकारची भीती होती. त्यामुळे काही वेळा टिळकांना सार्वजनिक ठिकाणी भाषण करण्यास बंदी घालण्यात येत असे.बेळगावात टिळकांचे भाषण आयोजित करण्याचे ठरले तेव्हा ब्रिटिश प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी भाषण करण्यास परवानगी नाकारली. परंतु गोविंदराव याळगी घाबरले नाहीत. त्यांनी एका रात्रीत पर्यायी खासगी जागेची व्यवस्था केली आणि टिळकांचे भाषण घडवून आणले. ही घटना गोविंदरावांच्या धाडसाचे, संघटनकौशल्याचे आणि प्रसंगावधानाचे उदाहरण मानले जाते.

ब्रिटिश शासनाच्या निर्बंधांना चुकवून राष्ट्रीय विचारांची सभा आयोजित करणे हे त्या काळी अत्यंत जोखमीचे काम होते. सभेवर पोलिसांची नजर होती. आयोजकांवर खटले भरले जाऊ शकत होते. तरीही गोविंदरावांनी लोकमान्यांच्या विचारांचा प्रसार थांबू दिला नाही. त्यांनी कायद्याच्या चौकटीतील उपलब्ध मार्गांचा वापर करून जनजागृतीचे कार्य चालू ठेवले. **(क्रमशः)**





जात्यावरच्या ओव्या.....

आली आली गौराई
मखरात बैसली
हलतो डुलतो फुलोरा
साज पाहून हसली ||८७४||

आली आली गौराई
बोलावते भावजयी
पुरणा वरणाचा स्वैपाक
मला जमणार नाही ||८७५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७७



ज्योतिर्मय साहित्य

ही चिंता का टाकून द्यायची ? कारण जी गोष्ट मुळात नाहीच आहे, तिच्याबद्दल चिंता करून काय उपयोग ? मोहमायेमुळे हा संसार आपल्याला खरा वाटतो. त्याची भूल आपल्याला पडते. पण खऱ्या सत्यापासून आपण लांब जातो. वाळवंटातील तहानलेल्या माणसाला मृगजळ दृष्टीस पडते. तिथे आपल्याला नक्कीच पाणी मिळेल या आशेने तो त्याच्या शोधात पुढे पुढे जात राहतो. शेवटी त्याला लक्षात येते की आपल्याला जे पाणी वाटले होते, ते तर केवळ मृगजळ ! मृगजळ म्हणजे भ्रम. पाणी नाही हे सत्य. त्याप्रमाणेच हा संसार ! खरा वाटतो पण अखेरीस त्याची व्यर्थता लक्षात येते. खरी वस्तू एकच. ती म्हणजे भगवंताचे नाम. ते नाम पवित्र करणारे आहे. सत्याची जाणीव करून देणारे आहे. संसाराची व्यर्थता लक्षात आणून देणारे आहे. म्हणून हे मना, असे पवित्र नाम तू हृदयात धारण कर आणि संसाराची व्यर्थ चिंता सोडून दे. जी गोष्ट मुळात नाहीच तिची चिंता करण्यात काय अर्थ ?



तुकाराम महाराज म्हणतात,''हेचि थोर भक्ती आवडते देवा, संकल्पावी माया संसाराची.'' भक्ती करणे म्हणजे जी गोष्ट आपल्याला अत्यंत प्रिय असते, ती परमेश्वराला अर्पण करावी. संसार, मुलेबाळे या गोष्टी आपल्या अत्यंत प्रिय असतात. त्यांच्यावर आपले जीवापाड प्रेम असते. हेच प्रेम भगवंताला अर्पण करावे. आणि भगवंताचे प्रेम अंतर्यामी धारण करावे.

स्वसंवाद :


१. ज्या शिक्षण, नोकरी, संपत्ती किंवा नात्यांना मी माझ्या जीवनाचे सार्थक मानून बसलो आहे, ते खरंच चिरंतन सत्य आहे की केवळ एक तात्पुरता भ्रम (मृगजळ) आहे?


२. ''म्हातारपणी माझे कसे होईल? मुले मला सांभाळतील ना?'' अशा भविष्यातील भवाच्या (संसाराच्या) व्यर्थ चिंतांमध्ये मी माझा आजचा दिवस आणि मनाची शांतता गमावत आहे का?

३. माझ्या अंतर्मनात साचलेला बऱ्या-वाईट वासनांचा कचरा साफ करण्यासाठी मी पतितांना पावन करणाऱ्या राघवाच्या नामाचा आश्रय किती वेळा घेतो?

४. तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे, मी प्रपंचातील माझी सर्व आसक्ती आणि प्रेम भगवंताच्या चरणी अर्पण करून निर्वासन भक्तीचा अनुभव घ्यायला तयार आहे का? **(क्रमशः)**







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामाचे सूक्ष्म स्वरूप

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरुद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

आपले सण आपले उत्सव
पितृपक्ष

मी आज त्यांचे समोर केवळ वल्कले नेसून जेवण वाढण्याची मला लाज वाटली, म्हणून मी इथून निघून गेले. पितृगण प्रत्येक अमावस्येला वंशजाच्या कडून श्राद्ध होईल व आपल्याला अन्न पाणी मिळेल यासाठी दारापाशी सूर्यास्त होईपर्यंत तहान भुकेने व्याकुळ होऊन तिष्टत बसतात. जर त्या दिवशी श्राद्ध केले गेले नाही, तर ते दुःखाने उसासे टाकत आपल्या लोकात परत जातात. म्हणून दर अमावस्येला श्राद्ध अवश्य करावे. असे न चुकता करणारा व गयेत श्राद्ध करणारा त्याच्या स्वतःच्या मृत्यू पश्चात आपल्या पित्रां समवेत ब्रह्म लोकात वास्तव्य करतो. तिथे तहान भूक लागत नाही. असे नियमित श्राद्ध करणाऱ्यांचे घरात कोणी दुःखी राहत नाही. पितरांची पूजा करून माणूस, आयुष्य, पुत्र, यश, स्वर्ग, कीर्ती, पुष्टी, बल, श्री, पशु, सुख आणि धनधान्य प्राप्त करतो. देव कार्या हून ही पितृ कार्य करणे याचे विशेष महत्त्व असते आहे. देवतांचे आधी पितरांना प्रसन्न करणे अधिक कल्याणकारी आहे. भगवान म्हणतात, जे लोक आपले पितृगण देवगण ब्राह्मण व अग्नी यांची पूजा करतात, ते सर्व प्राण्यांच्या अंतरात्म्यात समाविष्ट माझीच पूजा करतात. विधीपूर्वक व आपल्या कुवतीनुसार श्राद्ध करून मनुष्य ब्रम्हा पर्यंत सर्व चराचर जगताला प्रसन्न करून घेतो.



आजच्या नवविवाहिताना हे समजून द्या

मित्रांनो आणि वाचकहो,
आजचा काळ तंत्रज्ञान-विद्याचा आहे. गुगलचा आहे, लॅपटॉपचा आहे व दोघेही नोकरदार असल्यामुळे सणवार, रूढी परंपरा आणि नात्याचं मूल्य कमी होत आहे का? परत स्त्रीपुरुष समानता, महिलांचे स्वतंत्र विश्व व अधिकार यावर भर आहे. काळानुसार लोक नोकरीव्यवसाच्या निमित्त दूर जाऊ लागले. अंतर वाढली. लग्न नौकरी शिक्षण सगळंच बदललं.करियरच्या घोड्यावर स्वार होऊन सर्व परदेशात जात आहेत. त्यामुळे भेटी दुरावल्या त्याऐवजी भेटकार्डे वाढली. रूढी परंपरा नको वाटतात. त्या वैद्यानिक वाटत नाही. हे सगळे विचार व वाद जरी काही वेळासाठी बाजूला ठेवले, तरी यामागचा बंधूभाव, निरलस प्रेम, भेटीची ओढ, आठवणी व उजाळा या गोष्टीचा विचार आपण यांना सांगावा. कितीदा असे होते की केवळ स्पष्ट बोललो नाही. एकमेकाच्या समोर आलो नाही. सांगोवांगी ऐकलेल्या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावला नाही. म्हणून लहान लहान बाबी गैरसमजाच खूप मोठ रूप धारण करतात. माणसं व नाती कायमची दुरावतात. जवळ कितीही पैसा असला तरी, मायेचे दोन शब्द बोलणारी "आपली माणसं"जवळ असणं किती महत्वाचं आहे, हे ती त्याच्याजवळ नसतात त्यांनाच माहित असतं. आईवडील यांनी यागोष्टी समजून सांगाव्या. मी माझ यापलीकडे एक जग आहे ते सुरेख आहे ते जपायचं आहे. बस आज एवढं पुरं. आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे. स्वस्थ राहा मस्त राहा.
सुप्रभात.



गुणकारी आलं (अद्रक)

ज्योतिर्मय साहित्य

आल्याचा वापर करून शरीरातील युरीक ॲसिड करू शकता कमी, जाणून घ्या सेवनाची पद्धत

आजकाल शरीरात यूरिक ॲसिड वाढणं ही एक कॉमन समस्या झाली आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीची लाइफस्टाईल यामुळे अनेकांना ही समस्या होते. जेव्हा शरीरात यूरिक ॲसिड वाढतं तेव्हा सांधे, जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज अशा समस्या होतात. जर वेळीच यावर उपचार केले नाही तर ही समस्या आणखी वाढू शकते. यूरिक ॲसिड कंट्रोल करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपायही करू शकता. जवळपास सगळ्याच किचनमध्ये मिळणारी एक गोष्टी ही समस्या दूर करू शकते. ही गोष्ट म्हणजे आलं.

यूरिक ॲसिड कमी करतं आलं

आल्याच्या चहापासून ते वेगवेगळ्या पदार्थांमध्ये समावेश केला जातो. याने पदार्थांची टेस्ट तर वाढतेच सोबच यात अनेक औषधी गुणही असतात. यातील अँटी-इन्फ्लेमेटरी आणि अँटी-ऑक्सिडेंट ने शरीरातील सूज कमी होते. तसेच आल्याने पचनक्रियाही चांगली होते. शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघण्यास मदत मिळते.

आलं कसं करतं काम?

आल्यामध्ये जिंजरोल्स नावाचं एक शक्तीशाली तत्व असतं, जे शरीरात यूरिक ॲसिड जमा होण्यापासून रोखतं. हे तत्व यूरिक ॲसिडचे क्रिस्टल बनण्याची प्रक्रिया हळूवार करतं. ज्यामुळे जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज कमी होते. तसेच याच्या मदतीने शरीरात रक्तप्रवाह सुद्धा सुरळीत होतो. इतकंच नाही तर शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघतात.

आल्याचं सेवन करण्याची योग्य पद्धत

आल्याचं सेवन वेगवेगळ्या प्रकारे

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

तुम्ही करू शकता. मात्र, याचा योग्य पद्धतीने वापर करणं गरजेचं आहे. तेच जाणून घेऊया...

आल्याचा चहा

आल्याचा चहा यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी एक बेस्ट उपाय आहे. यासाठी ताज्या आल्याचे छोटे-छोटे तुकडे करा आणि ते पाण्यात उकडून घ्या. तुम्हाला हवं तर तुम्ही यात थोडं मध आणि लिंबाचा रसही टाकू शकता. याच चहाचं दिवसातून दोन वेळा सेवन करा.

आलं आणि हळदीचं मिश्रण

आलं आणि हळद दोन्हींमध्ये अँटी इन्फ्लेमेटरी गुण भरपूर असतात. या दोन्हींचं मिश्रण करून एक पेस्ट बवा आणि ही पेस्ट कोमट पाण्यात टाकून सेवन करा. याने यूरिक ॲसिड कमी करण्यास मदत मिळते.

आल्याचा रस

ताज्या आल्याचा थोडा रस काढून त्यात थोडा लिंबाचा रस टाका. हा रस सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा. याने शरीर आतून डिटॉक्स होईल आणि यूरिक ॲसिडही कंट्रोल होईल.

आल्याचं तेल

आल्याचा तेलाचा सुद्धा तुम्हाला जॉईंट्समधील सूज आणि वेदना कमी करण्यास करू शकता. या तेलाने जॉईंट्सवर हलक्या हाताने मालिश करा. याने ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं आणि वेदनाही कमी होतात.

काय काळजी घ्या?

आल्याचं जास्त सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते. त्यामुळे याचं सेवन कमी प्रमाणात करा.

जर तुम्हाला आरोग्यासंबंधी एखादी गंभीर समस्या असेल तर आल्याचं सेवन करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

****



सावकाश

आज आहे रविवार
म्हटले जरा घरातील
कामे सावकाश आवरावी
एक काम करता
उभे पुढे दुसरे
धावपळ किती करावी

सावकाश शांतपणे आज
कामे घरातील उरकून
आराम जरा करावा
स्पेशल करुन स्वयंपाक
ओठी गाणी गुणगूणत
एकांतात वेळ घालावा

जामनेरमध्ये रंगले 'अक्षरधारा' राज्यस्तरीय कविसंमेलन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

जामनेर (गोकुळसिंग राजपूत)- कविता ही केवळ भावभावनांची अभिव्यक्ती नसून ती जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारे प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक कवीची शैली, विषय आणि मांडणी वेगळी असते. कुणाची कविता प्रेमाची, कुणाची विद्रोहाची, तर कुणाची निसर्ग आणि जीवनातील वास्तव मांडणारी असते. या विविधतेतच कविसंमेलनाचे खरे सौंदर्य दडलेले आहे, असे प्रतिपादन सुरत येथील खानदेश साहित्य संघाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कवी ईश्वर पाटील यांनी केले.

जगदुरू संत तुकोबाराय साहित्य परिषद, जामनेर यांच्या वतीने मराठा मंगल कार्यालयात आयोजित पहिल्या 'अक्षरधारा' राज्यस्तरीय कविसंमेलनात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या साहित्यिक सोहळ्याला राज्यभरातून कवी, साहित्यिक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ईश्वर पाटील म्हणाले की, पुणे आणि मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये होणाऱ्या कविसंमेलनांच्या तुलनेत जामनेर येथे रसिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद विशेष कौतुकास्पद आहे. अशा साहित्यिक उपक्रमांमुळे जामनेरच्या सांस्कृतिक आणि



साहित्यिक क्षेत्राला नवी ऊर्जा व बळ मिळेल. आपल्या भाषणादरम्यान त्यांनी सिनेकलावंत नाना पाटेकर यांच्या आवाजातील संवादशैलीत डायलॉगबाजी करून उपस्थितांची दाद मिळवली.

संमेलनाचे उद्घाटन ग. स. सोसायटीचे उपाध्यक्ष अनिल गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर राज्याच्या विविध भागांतून आलेल्या कवींनी आपल्या दर्जेदार आणि विविध विषयांवरील कविता सादर करून उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रेम, निसर्ग, सामाजिक वास्तव, संघर्ष, विद्रोह आणि मानवी जीवनातील विविध पैलू कवितांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आले.

'वेणू' कवितासंग्रहाचे प्रकाशन

यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मोलखेडा येथील कवी आनंदा वारांगणे यांच्या 'वेणू' या कवितासंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्यामुळे संमेलनाला साहित्यिक वैभव लाभले.

कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे नाशिक विभागीय अध्यक्ष राम पवार, खानदेश साहित्य संघाचे गुजरात प्रदेशाध्यक्ष जितेंद्र बहारे, जयश्री देवरे, अनिल पाटील, प्रा. विमल वाणी, अशोक कोळी, उपसंपादक गोकुळसिंग राजपूत सावळदबारा,भुसावळ शिक्षक सोसायटीचे पदाधिकारी तसेच विविध सामाजिक व साहित्यिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी आहेर यांनी केले. गंगाराम नरवाडे व योगेश पाटील यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले, तर सुनील चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले. साहित्यप्रेमी आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात 'अक्षरधारा' कविसंमेलन उत्साहात संपन्न झाले.



आरळे शाळेत 'साहित्यिक आपल्या भेटीला' उपक्रमातून महा आनंददायी शनिवार

ज्योतिर्मय 📖 साहित्य

आरळे, ता. जि. सातारा – वसुधा फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने आयोजित 'साहित्यिक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत जि. प. प्राथमिक शाळा आरळे येथे आनंददायी शनिवार उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. साहित्य, कला, मनोरंजन, संस्कार आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा शनिवार विद्यार्थ्यांसाठी 'महाआनंददायी शनिवार' ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसुधा फाऊंडेशन पुणेच्या अध्यक्षा सौ. वसुधा वैभव नाईक होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पाठ्यपुस्तकातील कवी श्री. राम घडे उपस्थित होते. तसेच राजयुवा प्रकाशनचे अध्यक्ष गौरव पुंडे, काव्ययोग काव्यसंस्थेचे अध्यक्ष योगेश हरणे आणि युवा कवयित्री सायली ढेबे यांची उपस्थिती लाभली. माझं कवितांचं गाव जकातवाडीचे अध्यक्ष प्रल्हाद पारटे सर व उपाध्यक्ष श्री. विश्वास नेरकर सर यांनी कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना 'रमाची पाटी' हा चित्रपट दाखविण्यात आला. विद्यार्थ्यांनी चित्रपटाचा मनमुराद आनंद घेतला. त्यानंतर चित्रपट तसेच साहित्याशी संबंधित विविध प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले. योग्य उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. या प्रश्नमंजुषेमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आणि त्यांना विचार करण्याची संधी मिळाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी व उपस्थित साहित्यिकांनी आनंददायी बालगीते आणि कविता सादर केल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे कविता व बालगीते सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. साहित्यिकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि कुतूहल दिसून येत होते.

वसुधा फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. वसुधा वैभव नाईक यांनी विद्यार्थ्यांना वही, खोडरबर, शार्पनर व पेन्सिल यांचे वाटप केले. तसेच पालकांना पुस्तके भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक साहित्याची आणि पालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील सुंदर हेतू होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक सौ. सुषमा दिलीप आलेकरी यांनी विशेष नियोजन व मार्गदर्शन केले. उपशिक्षिका सौ. रंजना चौरे मॅडम यांनीही मोलाचे सहकार्य केले. शाला व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. प्रियांका भोसले, समितीचे सदस्य व पालक यांनी हिरिरीने सहभाग घेतला. कार्यक्रमानंतर सर्वांनी सुंदर स्नेहभोजनाचा आनंद घेतला. माझं कवितेचे गाव जकातवाडीला भेट दिली. साहित्यिक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यातील स्नेह अधिक दृढ झाला. शिक्षणासोबत साहित्य, कला, संस्कार आणि आनंद यांची सांगड घालणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहणारा ठरला. 'वाचा, विचार करा, व्यक्त व्हा आणि आनंदाने शिका' हा संदेश देत आरळे शाळेतला हा 'आनंददायी शनिवार' खऱ्या अर्थाने महाआनंददायी शनिवार ठरला.

एसटी सवलतीसाठी १ ऑक्टोबरपासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य

कन्नड आगार प्रमुख विजय काळवणे यांची माहिती; ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांनी नोंदणी करण्याचे आवाहन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

कन्नड /छत्रपती संभाजीनगर (गोकुळसिंग राजपूत)- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबरपासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. सवलतीचे तिकीट देताना एनसीएमसी कार्डचा वापर करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असल्याची माहिती कन्नड आगार प्रमुख विजय काळवणे यांनी दिली.

एसटी महामंडळाकडून शासनाच्या निर्देशानुसार विविध सामाजिक घटकांना सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सवलतींचा समावेश आहे. या सवलतीच्या प्रवासाचे अधिक सुलभ आणि डिजिटल पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी एनसीएमसी कार्ड प्रणालीचा वापर करण्यात येत



आहे.

१ ऑक्टोबरपासून सवलतीचे तिकीट एनसीएमसी कार्डच्या माध्यमातूनच वितरित केले जाणार आहे. त्यामुळे सवलतीचा लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांनी त्यापूर्वी एनसीएमसी कार्डची नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.

ज्या प्रवाशांकडे ॲक्टिव्ह एनसीएमसी कार्ड उपलब्ध आहे किंवा एनसीएमसी कार्ड नोंदणी केल्याची क्यूआर कोड असलेली पावती आहे, अशा प्रवाशांना सवलतीचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे संबंधित सवलतधारक प्रवाशांनी वेळेत एनसीएमसी कार्डची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन कन्नड आगार प्रमुख विजय काळवणे यांनी केले आहे.

मानसिक आरोग्य सप्ताहाचे उद्घाटन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

जालना – मानस फाउंडेशन, जालना यांच्या वतीने ४ ऑक्टोबर रोजी 'मानसिक आरोग्य सप्ताहा'चे उद्घाटन मानस हॉस्पिटल येथे झाले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना डॉ. सुजाता देवरे यांनी मानसिक आजारांबाबत समाजात व्यापक जनजागृती होण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश अंबेकर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून विनोद जैतमहाल यांची उपस्थिती होती. मानस फाउंडेशनच्या उद्दिष्टांविषयी बोलताना विनोद जैतमहाल म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या युगात मानसिक आरोग्य जपण्यासोबतच व्यसनमुक्ती आणि शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.


फाउंडेशन या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रामाणिक




प्रयत्न करत आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रकाश अंबेकर यांनी स्पष्ट केले की, मानसिक आजारांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलणे आणि गरजूंना वेळेत मानसशास्त्रीय उपचार, प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हेच मानस फाउंडेशनचे मुख्य ध्येय आहे. संशोधन आणि जनजागृतीच्या माध्यमातून ही चळवळ अधिक तीव्र केली जाईल.

प्रास्ताविक सतीश खरटमल यांनी, तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. यशवंत सोनुने यांनी केले. या सोहळ्यास रुग्ण व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या मानसिक आरोग्य सप्ताहाच्या निमित्ताने पुढील सप्ताहभर विविध स्पर्धा, व्याख्याने आणि जनजागृतीपर उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.











साईकिरण याची यशोगाथा

ज्योतिर्मय साहित्य

अनुकूल परिस्थितीत यश मिळवणे त्या मानाने सोपे असते; परंतु प्रतिकूल परिस्थितीत झगडून यश मिळवणे हे अत्यंत कष्टाचे असते. यात तुमचा संयम, बुध्दिमत्ता यांची कसोटी लागते. साईकिरण याची यशोगाथा ही अशीच प्रेरणादायी, सर्वांना मार्गदर्शन करणारी आहे. तेलंगणातील एका अत्यंत गरीब घरातील मुलगा नंदला साईकिरण याने आपल्या कर्तृत्वाने सर्वांना थक्क केले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत संपूर्ण भारतात २७ वा क्रमांक मिळवून साईकिरण याने आय.ए.एस. अधिकारी होण्याचे स्वतःचे आणि आपल्या आईचे स्वप्न पूर्ण केले आहे. नंदला साईकिरण याचा इथपर्यंतचा प्रवास खूप खडतर होता. तो लहान असताना त्याच्या वडिलांचे निधन झाले. संपूर्ण कुटुंबाची उदरनिर्वाहाची जबाबदारी त्याच्या आईवर आली. बिकट परिस्थिती असतानाही त्या माउलीने हार मानली नाही. कुटुंबाच्या खर्चासाठी तिने बिडी वळण्याचे काम केले रात्रदिवस बिडया वळल्यामुळे आईच्या बोटांवर फोड येत होते. माउलीचा संघर्ष पाहून साईकिरण यानी भविष्यात मोठे होवून आईला सुखी ठेवण्याचा निर्धार केला. साईकिरण यानी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, वारंगल येथून बी.टेक. पूर्ण केले. कॉलेजच्या काळातच त्यानी प्रशासकीय सेवेत जाण्याचा निश्चय केला. पदवी पूर्ण झाल्यावर त्यानी यूपीएससी हा कठीण मार्ग निवडला. आर्थिक चणचण असताना साईकिरण यानी कोणताही महागडा क्लास न लावता रात्रंदिवस अभ्यास केला. २०२३ मध्ये यूपीएससी परीक्षेत त्यानी २७ वा क्रमांक पटकावून यशाचे शिखर गाठले, तेव्हा त्याच्या आईच्या डोळयात आनंदाश्रू आले. त्या माउलीने सगळे आयुष्य फक्त मुलासाठी झिजवले. तिचा मुलगा आय.ए.एस. अधिकारी झाल्याचे समजताच तिच्या कष्टांचे सार्थक झाले हीच भावना तिच्या मनात होती. आजच्या तरूण पिढीला साईकिरण याची यशोगाथा निश्चितच प्रेरणादायी आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत सुध्दा सातत्याने प्रयत्न केल्यास यश मिळू शकते हे उदाहरण साईकिरण यानी दाखवून दिले आहे. शालेय शिक्षणापासूनच साईकिरण अत्यंत हुशार होता त्यानी १० वी मध्ये ९.८ तर १२ वी मध्ये ९८ टक्के गुण मिळवले होते. एन.आय.टी.मध्ये पदवी घेतल्यानंतर (क्युअल्कोम्म



साईकिरण याची यशोगाथा

३३ नुकूल परिस्थितीत यश मिळवणे त्या मानाने सोपे असते; परंतु प्रतिकूल परिस्थितीत झगडून यश मिळवणे हे अत्यंत कष्टाचे असते. यात तुमचा संयम, बुध्दिमत्ता यांची कसोटी लागते. साईकिरण याची यशोगाथा ही अशीच प्रेरणादायी, सर्वांना मार्गदर्शन करणारी आहे. तेलंगणातील एका अत्यंत गरीब घरातील मुलगा नंदला साईकिरण याने आपल्या कतृत्वाने सर्वांना थक्क केले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत संपूर्ण भारतात २७ वा क्रमांक मिळवून साईकिरण याने

गुंजारव

आय.ए.एस. अधिकारी होण्याचे स्वतःचे आणि आपल्या आईचे स्वप्न पूर्ण केले आहे. नंदला साईकिरण याचा इथपर्यंतचा प्रवास खूप खडतर होता. तो लहान असताना त्याच्या वडिलांचे निधन

झाले. संपूर्ण कुटुंबाची उदरनिर्वाहाची जबाबदारी त्याच्या आईवर आली. बिकट परिस्थिती असतानाही त्या माउलीने हार मानली नाही. कुटुंबाच्या खर्चासाठी तिने बिडी वळण्याचे काम केले रात्रदिवस बिडया वळल्यामुळे आईच्या बोटांवर फोड येत होते. माउलीचा संघर्ष पाहून

साईकिरण यानी भविष्यात मोठे होवून आईला सुखी ठेवण्याचा निर्धार केला. साईकिरण यानी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, वारंगल येथून बी.टेक. पूर्ण केले. कॉलेजच्या काळातच त्यानी प्रशासकीय सेवेत जाण्याचा निश्चय केला. पदवी पूर्ण झाल्यावर त्यानी यूपीएससी हा कठीण मार्ग निवडला. आर्थिक चणचण असताना साईकिरण यानी कोणताही महागडा क्लास न लावता रात्रदिवस अभ्यास केला. २०२३ मध्ये यूपीएससी परीक्षेत त्यानी २७ वा क्रमांक पटकावून यशाचे शिखर गाठले, तेव्हा त्याच्या आईच्या डोळयात आनंदाश्रू आले. त्या माउलीने सगळे आयुष्य फक्त मुलासाठी झिजवले. तिचा मुलगा आय.ए.एस. अधिकारी झाल्याचे समजताच तिच्या कष्टांचे सार्थक झाले हीच भावना तिच्या मनात होती. आजच्या तरूण पिढीला साईकिरण याची यशोगाथा निश्चितच प्रेरणादायी आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत सुध्दा सातत्याने प्रयत्न केल्यास यश मिळू शकते हे उदाहरण साईकिरण

यांनी दाखवून दिले आहे. शालेय शिक्षणापासूनच साईकिरण अत्यंत हुशार होता त्यानी १० वी मध्ये ९.८ तर १२ वी मध्ये ९८ टक्के गुण मिळवले होते. एन.आय.टी.मध्ये पदवी घेतल्यानंतर (क्युअल्कोम्म) या नामंकित कंपनीत सिनियर हार्डवेअर सिस्टिम इंजिनिअर म्हणून त्याला उत्तम पगाराची नोकरी मिळाली. नोकरीमध्ये चांगला पगार असला तरी त्याला तळागाळातील लोकांसाठी व समाजासाठी काहीतरी करायचे होते म्हणून त्यांनी यूपीएससीचा मार्ग निवडला. या परिक्षेत यश मिळवण्यासाठी त्यांनी सेल्फ स्टडी वर भर दिला. अधीच्या प्रश्नपत्रिका वारंवार सोडवल्यामुळे पाया पक्का झाल्याचे त्याचे म्हणणे आहे. तसेच उत्तरे वारंवार लिहून काढल्यामुळे त्याचा फायदा झाला असेही तो सांगतो. आज मुले थोडेसे अपयश आले की, आत्महत्या करण्याइतके टोकाचे पाऊल उचलतात. कधी कधी महागडे कोचिंग क्लास लावूनही मुले संघर्षाला घाबरून मध्येच हार मानून शिक्षण सोडून देतात. अशा सर्वांसाठी साईकिरण यांचा प्रवास, त्यांचे यश हे निश्चितच प्रेरणादायी आहे. प्रतिकूल परिस्थितीतही लढून आपल्या आई-वडिलांचे कष्ट बघून यश संपादन करणे हेच जीवनाचे ध्येय ठरवायचे असते हे साईकिरण यानी दाखवले आहे. अशी उदाहरणे वाचून त्याच्याइतकेच आपणही कष्ट घेणे हा बोध सर्व विद्यार्थी वर्गाने घ्यायला हवा.

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ : भारताच्या क्रीडा क्षेत्राला नवी दिशा!

ज्योतिर्मय साहित्य

जपानमधील आयची-नगोया येथे झालेल्या २०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेने भारतीय क्रीडा क्षेत्राला नवा आत्मविश्वास दिला आहे. आशियातील सर्वोच्च बहुक्रीडा स्पर्धेत भारताने यंदा २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य अशी एकूण ८५ पदके जिंकत पदकतालिकेत चौथे स्थान मिळवले. २०२२च्या हांगझोऊ स्पर्धेतील १०६ पदकांच्या विक्रमानंतर हा भारताचा दुसरा सर्वोत्तम पदकविजय आहे. विशेष म्हणजे यंदाचा भारतीय चमू मागील स्पर्धे पेक्षा तुलनेने लहान होता. त्यामुळे ८५ पदकांचे हे यश निश्चितच उल्लेखनीय आहे.

भारतीय खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत चमकदार कामगिरी केली. नेमबाजी, तिरंदाजी, बॉक्सिंग, कुस्ती, हॉकी, कबड्डी, ॲथलेटिक्स, क्रिकेट आणि गोल्फ या क्रीडा प्रकारांनी भारताच्या पदकतालिकेत महत्त्वाची भर घातली. नेमबाज नीरू धांडा हिने दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळवत विशेष ठसा उमटवला. तिच्या कामगिरीमुळे भारताच्या महिला नेमबाजीला नवी ओळख मिळाली. तिरंदाजीत महिलांच्या रिकर्व्ह संघाने ऐतिहासिक कामगिरी केली, तर कुमकुम अनिल मोहोड हिने वैयक्तिक रिकर्व्हमध्ये भारतासाठी ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले.

बॉक्सिंगमध्ये भारतीय खेळाडूंनी तीन सुवर्णपदके जिंकून आपली ताकद दाखवून दिली. लव्हलिना बोर्गोहेन हिनेही सुवर्णपदक जिंकून भारतीय महिला बॉक्सिंगच्या उज्ज्वल परंपरेला पुढे नेले. कुस्तीमध्येही भारताने महत्त्वाची पदके मिळवली. हॉकीमध्ये भारतीय पुरुष संघाने सुवर्णपदक कायम राखले, तर महिला संघाने तब्बल ४४ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. महिला हॉकी संघाच्या या विजयामुळे २०२८ लॉस एंजेलिस ऑलिंपिकचे थेट स्थानही निश्चित झाले.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारताच्या पदकांचा विस्तार अनेक क्रीडा प्रकारांत झाला आहे. एमएमए आणि सॉफ्ट टेनिससारख्या नव्या क्षेत्रांतही भारताने पदके जिंकली. गोल्फमध्ये भारतीय महिला खेळाडूने ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले. यावरून भारतीय क्रीडा क्षेत्र आता केवळ क्रिकेट, हॉकी, कुस्ती किंवा नेमबाजीपुरते मर्यादित राहिलेले नाही, हे स्पष्ट होते.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

मात्र या यशाबरोबर काही बाबींचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. हांगझोऊच्या तुलनेत यंदाची एकूण पदकसंख्या कमी आहे. काही पारंपरिक क्रीडा प्रकारांत भारताला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे केवळ पदकसंख्येवर समाधान न मानता कुठल्या क्रीडा प्रकारांत आपण मागे पडलो, त्याची कारणे शोधून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ऑलिंपिकच्या तयारीसाठी महत्त्वाचा टप्पा

२०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेचे सर्वांत मोठे महत्त्व म्हणजे २०२८च्या लॉस एंजेलिस ऑलिंपिकची तयारी. आशियातील बलाढ्य खेळाडूंशी स्पर्धा करताना मिळालेला अनुभव भारतीय खेळाडूंना ऑलिंपिकमध्ये निश्चितच उपयोगी ठरणार आहे. कोणत्या क्षेत्रात सुधारणा आवश्यक आहे, कोणत्या खेळाडूंची क्षमता पदक जिंकण्याची आहे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर दबावाच्या परिस्थितीत कामगिरी कशी उंचावता येते, याचा मौल्यवान अनुभव या स्पर्धे तून मिळाला आहे.

आता पुढील दोन वर्षे भारतीय क्रीडा व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण, आधुनिक क्रीडा विज्ञान, आहारतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, अत्याधुनिक उपकरणे, दुखापतींवर योग्य उपचार आणि सातत्यपूर्ण आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा अनुभव मिळणे आवश्यक आहे. पदकविजेत्यांबरोबरच पदकापासून थोडक्यात दूर राहिलेल्या खेळाडूंवरही विशेष लक्ष दिले पाहिजे.

भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी आशादायी भविष्य

आयची-नगोया येथील कामगिरी ही केवळ ८५ पदकांची आकडेवारी नाही; ती भारतीय क्रीडा क्षेत्रातील बदलाची नांदी आहे. ग्रामीण आणि छोट्या शहरांमधूनही प्रतिभावान खेळाडू पुढे येत आहेत. महिलांचा सहभाग आणि यश वाढत आहे. त्यामुळे शाळा, महाविद्यालये, जिल्हा आणि राज्य पातळीवर क्रीडा सुविधा वाढवणे, प्रशिक्षकांची गुणवत्ता सुधारणे आणि आर्थिक मदत वेळेवर उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

आशियाई स्पर्धेतील यशामुळे नव्या पिढीला खेळाकडे करिअर म्हणून पाहण्याची प्रेरणा मिळेल. पालकांचा दृष्टिकोन बदलेल आणि विविध खेळांमध्ये सहभागी होणाऱ्या मुला-मुलींची संख्या वाढेल. 'खेळा आणि जिंका'पासून 'खेळा, घडवा आणि देशासाठी पदक जिंका' या दिशेने भारतीय क्रीडा क्षेत्राची वाटचाल होणे आवश्यक आहे.

आयची-नगोया स्पर्धेने भारताला अभिमानाचे ८५ पदके दिली आहेत; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे तिने ऑलिंपिकच्या स्वप्नासाठी नवी ऊर्जा दिली आहे. या यशाचा योग्य आढावा घेऊन नियोजनबद्ध प्रशिक्षण, पायाभूत सुविधा आणि खेळाडू-केंद्रित धोरण राबवले, तर २०२८च्या लॉस एंजेलिस ऑलिंपिकमध्ये भारताची पदकसंख्या आणखी वाढू शकते. आजची ८५ पदकांची कामगिरी उद्याच्या ऑलिंपिक पदकांची मजबूत पायाभरणी ठरावी, हीच अपेक्षा!

मराठवाडा युवा मंचतर्फे यंदाचा वैद्यकीय पुरस्कार प्रख्यात नेत्रतज्ञ डॉ. अनिल दुधभाते यांना प्रदान

ज्योतिर्मय साहित्य



पुणे – वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि नेत्रसेवेच्या माध्यमातून समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचविलेल्या योगदानाची दखल घेत मराठवाडा युवा मंचतर्फे यंदाचा प्रतिष्ठेचा वैद्यकीय पुरस्कार प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते यांना प्रदान करण्यात आला.

शून्यातून विश्व निर्माण करत हजारो अंधारलेल्या जीवनात दृष्टीचा प्रकाश पेरणारे प्रसिद्ध नेत्रतज्ञ म्हणजे डॉ अनिल दुधभाते होत.

एम.बी.बी.एस., एम.एस., एफ.सी.पी.एस. या उच्च शैक्षणिक पात्रतेसोबतच वैद्यकीय कौशल्य, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि रुग्णसेवेचा ध्यास यांची सांगड घालत डॉ. अनिल दुधभाते यांनी नेत्रसेवेच्या क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

एक लाखांहून अधिक यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया आणि सहा लाखांहून अधिक रुग्णांवर उपचार करत त्यांनी असंख्य रुग्णांच्या आयुष्यात नवदृष्टीची पहाट आणली आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू रुग्णांपर्यंत नेत्रसेवा पोहोचावी, या उद्देशाने त्यांनी आजवर एक हजारांहून अधिक मोफत नेत्रशिबिरांचे आयोजन केले आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रिया, विविध नेत्रविकारांवरील उपचार तसेच अत्याधुनिक नेत्रसेवा याबरोबरच नेत्रदान चळवळीला प्रोत्साहन देण्याचे कार्यही सातत्याने सुरू ठेवले आहे.

अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा आणि तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरच्या माध्यमातून त्यांनी नेत्रसेवेला आधुनिकतेची जोड देत रुग्णकेंद्री वैद्यकीय सेवेचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

केवळ उपचार करण्यापुरतेच कार्य मर्यादित न ठेवता, सर्वसामान्यांना डोळ्यांची काळजी, नेत्रविकार आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यांची माहिती सहज आणि सोप्या भाषेत सर्वांना कळावी, या हेतूने त्यांनी 'नेत्रकोष' हे पुस्तकही लिहिले आहे. नेत्रकोष हे पुस्तक मे महिन्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभ हस्ते मुंबई येथे प्रकाशित झाले आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून डॉक्टरांचा नेत्रआरोग्याबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय आहे. वैद्यकीय कौशल्याला सेवाभावाची जोड, रुग्णसेवेला सामाजिक बांधिलकीची किनार आणि नेत्रदान चळवळीला सातत्यपूर्ण प्रोत्साहन अशा बहुआयामी कार्याचा गौरव म्हणून मराठवाडा युवा मंचतर्फे डॉ. अनिल दुधभाते यांना हा या वर्षीचा वैद्यकीय पुरस्कार काल पुण्यात प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे डॉ. अनिल दुधभाते यांच्या कार्याची केवळ दखलच घेतली गेली नाही, तर समाजासाठी निःस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींना एक प्रेरणादायी संदेशही मिळाला आहे. दृष्टी देण्याचे कार्य करणाऱ्या या दृष्टीदूताचा झालेला सन्मान हा त्यांच्या कार्याचा गौरव तर आहेच, पण हजारो रुग्णांच्या आयुष्यात त्यांनी निर्माण केलेल्या आशेचा आणि उजेडाचा सन्मान आहे. डॉ. अनिल दुधभाते यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वैद्यकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

कुटुंबप्रमुख हवा आहे! भाग ५ : आपल्या मुळांचा शोध

ज्योतिर्मय साहित्य

दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे रविवारी मामा आजोबांनी नाश्त्याच्या टेबलावर समोर एक मोठा कागद, काही रंगीत पेन्सिली, स्केच पेन आणि जगाचा व भारताचा नकाशा ठेवला व ते मुलांच्या प्रतिसादाची वाट पाहू लागले.

''हे काय, मामा आजोबा?'' त्याने विचारलं.

''आपल्या मुळांचा शोध.'' श्रुतकीर्तीने लगेच पेन्सिल हातात घेतली.

''माझं घर कुठे आहे?''

मामा आजोबांनी नकाशावर लॉस एंजेलिस दाखवलं. ''हे तुझं आजचं घर. पण आपल्या कुटुंबाची गोष्ट इथून सुरू होत नाही बर का.'' त्यांनी त्या जगाचा नकाशा बाजूला ठेवत भारताचा नकाशा समोर ओढला.

''हा भारत. तुमचे बाबा महाराष्ट्रातले. तुमची आईसुद्धा महाराष्ट्राचीच. त्यामुळे तुमच्या तुमच्याकडे महाराष्ट्राची घट्ट मुळे आहेत.''

''पण महाराष्ट्र म्हणजे काय?'' श्रीरामने विचारलं. मामा आजोबा क्षणभर विचारात पडले, काय सांगावे ह्या चिमुकल्यांना. कसे सांगावे महाराष्ट्र म्हणजे काय. त्यांचा प्रश्न साधा, सरळ व वरवर सोपा वाटतो, पण उत्तर तितकेच कठीण आहे आणि ते ही त्यांना समजेल अशा पद्धतीने सागणे.

''मुलांनो महाराष्ट्र म्हणजे फक्त नकाशावरचा एक प्रदेश नाही. भाषा, साहित्य, संगीत, सण, परंपरा, विचार, माणुसकी या सगळ्यांनी मिळून महाराष्ट्र घडतो, कुठ्लेळी राज्य अथवा देश फक्त भौगोलिक सीमांनी बनतो नसतो, तर तो बनतो तिथल्या लोकांमुळे, त्यांच्या वागण्यामुले, विचारांमुळे, चालीरीतींमुळे वगैरे.''

मामी आजीने हसत हसत विचारलं, ''आणि पुरणपोळी?'' दोन्ही मुलं हसली.

''हो,'' मामा आजोबा म्हणाले, ''पुरणपोळीही! पण फक्त पुरणपोळी खाण्यापुरता महाराष्ट्र नाही.''

मग त्यांनी मराठीतल्या चार ओव्या म्हणून दाखविल्या.

मना वासना दुष्ट कामा नये रे ।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।
मना धर्मता नीति सोडू नको हो ।
मना अंतरी सार विचार राहो ।।४।।

श्रीरामला त्या ओव्यांचा अर्थ समजला नाही; पण त्यातील लयबद्ध स्वर त्याला आवडले.

''मामा आजोबा, हे किती गोड आहे. काय आहे हे? मला मराठी शिकवाल का तुम्ही?''

''नक्की शिकवीन मराठी. मुलांनो ह्या चार ओळी समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेल्या 'मनाच्या श्लोकातील आहेत.''

''मनाचे श्लोक म्हणजे?''

''मनाचे श्लोक म्हणजे मनाला चांगले वागायला सांगण्याची दीर्घ कविता''.

''मनाला सांगता येते मामा आजोबा?''

''हो, तर. आपण आपल्या मनाला सांगू शकतो. त्यालाच अमेरिकेत 'माइंड म्यानेजमेंट' म्हणतात, पण आत्ता फक्त ते श्लोकच शिका तुम्ही हवे तर. बाकी नंतर पुढे शिका.''


दोन्ही मुलांनी एकदम विचारले, ''पण समर्थ रामदास स्वामी कोण होते? ते म्यानेजमेंट गुरु होते का महाविद्यालयातील मानसशास्त्राचे प्राध्यापक होते मामा आजोबा?''

''मुलांनो मी तुम्हाला ते सर्व नंतर सांगेन.''

''आणि संस्कृत?''

''ते ही शिकवीन.''

''मग मला हिंदीही शिकायची आहे,'' श्रीराम म्हणाला.



मामा आजोबा हसले. ''भाषा जितक्या शिकाल, तितकी माणसं अधिक समजतील, तसेच एक नुकतेच नवीन संशोधन आलेले आहे कि, भाषा व त्यातही संस्कृत बोलण्याने व व संस्कृतमधील मंत्र उच्चारण्याने त्याचे माणसाच्या मेंदूवर सकारात्मक परिणाम होतात.''

त्या दिवसापासून घरात एक नवा नियम झाला. रविवारी सकाळी 'मामा आजोबांचा तास'. एका रविवारी मराठी गोष्ट, दुसऱ्या रविवारी संस्कृत सुभाषित, तिसऱ्या रविवारी भारताचा इतिहास, तर कधी एखादा भारतीय सण, एखादी लोकपरंपरा किंवा एखाद्या थोर व्यक्तीची कथा. पण मामा आजोबा एक गोष्ट स्पष्ट सांगत, ''हे पाठांतराचे तास नाहीत. प्रश्न विचारा. शंका घ्या. समजून घ्या. आणि जे योग्य वाटेल ते आपल्या जीवनात अमलात आणा.''

कृष्णकांत आणि पामेला दूरून हे सगळं पाहत होते. एका संध्याकाळी पामेलाने कृष्णकांतला विचारलं, ''आपण मुलांसाठी एक कुटुंबप्रमुख शोधत होतो. पण मामा आजोबांनी तर घराच स्वरूपच बदलून टाकलं.''

कृष्णकांत हसला, ''म्हणूनच तू म्हणाली होतीस ते जिथे जातात, तिथे घरचे स्वरूप बदलून टाकतात.''

तेवढ्यात श्रीराम धावत आला. ''बाबा! मामा आजोबांनी मला एक प्रश्न विचारला आहे.''

''काय?''

''आपण भारतीय आहोत, हे कसं सिद्ध करणार?'' कृष्णकांत थबकला. मामा आजोबा दाराशी उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचं शांत हास्य होतं. पण कृष्णकांतला जाणवलं, मुलांचा संस्कारांचा प्रवास आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आहे.

क्रमशः भाग ६ : आपण भारतीय आहोत, हे कसं सिद्ध करणार?

शालेय विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा देणाऱ्या 'स्किल डेव्हलपमेंट' उपक्रमाचे उद्घाटन

ज्योतिर्मय साहित्य



पाषाण, पुणे – राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून, श्रीभगवती सेवा आश्रम व जीवन कौशल्य विकास, बाणेर यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा देणाऱ्या 'स्किल डेव्हलपमेंट' उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. हा उपक्रम काही समाजसेवकांच्या आर्थिक सौजन्याने राबविण्यात येत असून, त्याचा प्रारंभ लोकसेवा ई-स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, पाषाण येथील भव्य व्यासपीठावर झाला.

या उपक्रमाचे उद्घाटन श्री. अशोकजी करवा यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाचे प्रायोजक श्री. सुशिलजी अग्रवाल, तसेच श्री. शैलेशजी घाटपांडे, व्यवस्थापक, सेवा सहयोग, पुणे, श्री. संजय देशपांडे, चैतन्य स्किल डेव्हलपमेंट यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

''हस्तकौशल्यातून स्वयंपूर्णता'' हा महात्मा गांधींचा विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कौशल्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमा मागील प्रमुख उद्देश आहे. केवळ शैक्षणिक ज्ञान न देता विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण, व्यावहारिक ज्ञान आणि स्वावलंबनाची दिशा देण्याचा या उपक्रमातून प्रयत्न केला जाणार आहे.

प्रारंभी बालेवाडी, सुस आणि महाळुंगे परिसरातील पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये हा कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यातील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विविध उपयुक्त कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याची योजना आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लोकसेवा ई-स्कूलच्या कर्मचारीवृंदाचे मोलाचे सहकार्य लाभले.

या उपक्रमाच्या आयोजनामध्ये गिरीधर राठी, डॉ. श्याम कुलकर्णी, दयानंद चिखलकर, उल्हास चित्रे, सुपर्णाताई सरदेसाई,ओमजी चांडक तसेच श्रीभगवती सेवा आश्रमचे स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या हाताला कौशल्य, मनाला आत्मविश्वास आणि भविष्याला स्वावलंबनाची दिशा देणारा हा उपक्रम निश्चितच ''शिक्षणातून कौशल्य आणि कौशल्यातून स्वयंपूर्णता'' या संकल्पनेला बळ देणारा ठरणार आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559